**<u>वादीचा साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ४/३ तर्फे विधीज्ञ श्री. एस. बी. मंदाडे यांच्याकडून शपथेवर पुन्हा सुरु.</u>**

**०९.** मला लिहीता वाचता येत नाही. मी गट क्र.१६० मधली जमिन खरेदी घेतलेली आहे. गट क्र.१६० चा जुना सर्वे नं.१ आहे. सर्वे नं.१ मध्ये एकूण ३२ एकर जमिन होती. सर्वे नं.१ मध्ये कोणा कोणाचे किती क्षेत्र होते ते मला माहीत नाही. मी जमिन विठ्ठल नरसिंग बनवसे व चंचलाबाई विठ्ठल बनवसे यांच्याकडून खरेदी घेतली. विठ्ठल व चंचलाबाई यांना सगळी मिळून २ हे. ३४ आर जमिन होती. त्यांनी संपूर्ण २ हे.३४ आर जमिन मला विकलेली आहे. त्यांनी मला सोडून इतर कोणाला किती जमिन विक्री केलेली आहे ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला जमिन विक्री केल्यानंतर त्यांना त्या गटामध्ये जमिन शिल्लक नव्हती. माझ्या एकटीच्या नावावर किती जमिन खरेदी केली ते मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलाच्या नावावर किती जमिन खरेदी केली आहे ते मला माहीत नाही. मी घरकाम व शेती करते. मी माझे पती दुबईला होते त्या उत्पन्नातून जमिन खरेदी केलेली आहे. माझा मुलगा सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. माझ्या हक्कातील खरेदी खताचा क्रमांक मला सांगता येत नाही. खरेदीखताची तारीख दिनांक २३.१२.२००९ आहे. खरेदीखतापूर्वी आमच्यात लेखी ठराव किंवा करार झाला नव्हता. खरेदीखतापूर्वी आम्ही ताबा पावती करून घेतली नव्हती.

**१०.** मी माझ्या एकटीच्या नावावरील क्षेत्राच्या चतुःसिमा सांगू शकत नाही. मी माझ्या मुलाच्या नावावरील क्षेत्राच्या चतुःसिमा सांगू शकत नाही. मी एकत्र जमिनीच्या चतुःसिमा सांगू शकते. पूर्वेस विनायक माधवराव डुरे यांची जमिन, पश्चिमेस शिव व पाझर तलाव, उत्तरेस तुकाराम आप्पाराव आगलावे व बालाजी गोविंद आगलावे यांची जमिन व दक्षिणेस प्रतिवादीची जमिन आहे. खरेदीखतामध्ये पश्चिमेस काजळी हिप्परगा शिव जे नमूद आहे ते बरोबर आहे. कारण पश्चिमेस पाझर तलाव तसेच शिव दोन्ही

आहेत.

**प्रश्न. तुम्ही पाझर तलाव व शिव पश्चिमेकडे असल्याचे खरेदीखतात दुरूस्ती करून घेतली आहे काय ?**

**उत्तर – दोन्ही असल्याने आम्ही दुरूस्ती करून घेतलेली नाही.**

**११.** मी जमिन खरेदी करताना आम्ही खाजगी मोजणी केली होती. मोजणी कोणाकडून केली होती ते मला माहीत नाही. त्या मोजणी मध्ये २ हे. ३४ आर क्षेत्र भरले होते. जमिन खरेदी करताना मी ७/१२ उतारा पाहिला होता. आम्ही मोजणीचा अर्ज मोजणी ऑफीसला दिनांक २१.०६.२०१० रोजी दिला होता. मोजणी दिनांक १२.०६.२०१२ रोजी झाली. मोजणीच्या नोटीसा शेजाऱ्यांना दिल्या होत्या. जमिन मोजाताना मी हजर नसल्याने शेजारी हजर होते किंवा कसे ते सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या व प्रतिवादीमध्ये पूर्व पश्चिम धुरा आजही अस्तित्वात आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो धुरा ६ ते ७ फुट रुंद आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो धुरा दगडी पवळचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या धुऱ्यावर अंदाजे २० ते ३० वर्षे वयाचे झाडे आहेत. प्रतिवादीच्या जमिनीचा गट क्र.१५६ आहे. प्रतिवादींनी गट क्र.१५६ मधील जमिन कोणाकडून घेतलेली आहे ते मला सांगता येत नाही. प्रतिवादी क्र.१ ने सन १९७० मध्ये गट क्र.१५६ मधील जमिन खरेदी केली आहे किंवा कसे ते मला माहीत नाही. सन १९७१ मध्ये ती जमिन प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला विक्री केली आहे किवां कसे ते मला माहीत नाही. तेव्हापासून प्रतिवादी क्र.२ चा त्या जमिनीवर मालकी व ताबा आहे किंवा कसे ते मला माहीत नाही. गट क्र.१५६ मधील वाटण्या प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्यामध्ये झालेल्या आहेत किंवा कसे ते मला माहीत नाही. प्रतिवादी यांनी धुरा तोडल्याची गोष्ट मला दिनांक १७.०४.२०१० रोजी समजली. मोजणी झाल्यानंतर दिनांक २३.०४.२०१२ रोजी मोजणीदाराने हद्दीच्या खुणा केल्या होत्या. मोजणीच्या दुसऱ्यादिवशी हद्दीच्या खुणा केल्या होत्या. आमचा

धुऱ्याचा वाद तंटामुक्ती समितीकडे गेला होता. तंटामुक्ती समितीतील सदस्य जायमोक्यावर येऊन गेले होते. तंटामुक्ती समितीने केलेल्या पंचनाम्यावर मी किंवा माझ्या पतीने सही केली नव्हती. आम्ही पंचनाम्यासाठी गेलो नसल्याने सही केली नव्हती.

**१२.** दावा माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये मी सांगितल्याप्रमाणे तारखा नमूद आहेत. दाव्यामध्ये टंकलेखनात तारखेत चुक झालेली आहे. मला वाचता येत नसल्याने किती वेळा चुका झाल्या ते मी सांगू शकत नाही. प्रतिवादीचे भाऊ मयत झाल्यानंतर तीन वेळेला दावा दुरूस्त केला होता त्यानंतर केलेला नाही. प्रतिवादी क्र.२ ला किती मुले आहेत ते मला माहीत नाही. ते मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांची नावे माझ्या दिराने सांगितली होती. त्यांनी प्रतिवादी क्र.२ ला तीन लेकरे असल्याचे सांगितले होते. आम्ही त्या तीनही लेकरांना वारस म्हणून समाविष्ट केलेले आहे. साक्षी चंद्रशेखर मुंढे व सत्यम चंद्रशेखर मुंढे हे प्रतिवादी क्र.१ चे मुलगा व सुन आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रतिवादी क्र.१ च्या सुनेला पक्षकार केलेले नाही. मी प्रतिवादी क्र.४/१ यांच्यावर तसेच प्रतिवादी क्र.३/२ वर फौजदारी एकूण २ केस केलेल्या आहेत. प्रतिवादी क्र.४/१ विरूध्दच्या केस चा निकाल लागलेला आहे.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, बनवस यांनी गट क्र.१६० मध्येआम्ही जमिन खरेदी घेण्यापूर्वी आम्हाला ताबा दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५.०४.२०१० रोजी प्रतिवादी यांनी त्यांच्यात व आमच्यात असणारा पुर्व पश्चिम धुरा फोडल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.०६.२०१२ आम्ही खोटी मोजणी करून घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मोजणीच्या दुसऱ्यादिवशी मोजणीदाराने हद्दी निश्चित केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांनी रोवलेले खांब उपटून टाकले हे मी खोटे सांगत

आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०६.०४.२०१४ रोजी आम्ही प्रतिवादीला अतिक्रमीत जमिनीचा ताबा द्या अशी विनंती केल्याचे व त्यांनी नकार दिल्याचे व म्हणून आम्हाला दावा देणे भाग पडल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खोटी मोजणी करून प्रतिवादींना जाणुन बुजुन त्रास देण्यासाठी हा खोटा दावा दिला आहे. मी माझ्या व माझ्या मुलाच्यावतीने साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील सर्व मजकुर खोटा आहे व दावा खोटा आहे.

उलटतपास पुर्ण.

श्रृवणोत्तर स्वीकृत                                        समक्ष,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.09.10 10:35:06 +0530

( **स्वानंदी दे. वडगांवकर**)

दिनांक – ०९.०९.२०२५.                    सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,अहमदपूर.